


# VIDHYASHRI COACHING CLASSES
10 (Semi English)
**(Archana Dere)**
मराठी-

DATE: 20-03-21
TIME: 3 hrs
MARKS: 80
SEAT NO:

**विभाग १ - गदय**

**प्र.१ (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** आकृतिबंध पूर्ण करा. 2




त्या रात्री तब्बल सात तास, रेल्वेच्या धावपट्टीवर मदतीची याचना करत मी पडून राहिले. आश्चर्य म्हणजे माझी शुद्ध हरपली नव्हती आणि मेंदू पूर्ण तल्लखपणे तेथून सुटकेचा विचार करत होता. सगळीकडे उजाडलं आणि रेल्वेचे सफाई कामगार तिथे आले. हादरलेच ते मला तशा अवस्थेत पाहून. त्यांनी मला बरेली गावातील हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आणि सुरू झाले दुर्दैवाचे दशावतार.

बरेलीच्या त्या हॉस्पिटलमध्ये ना भूलतज्ज्ञ होता ना मला देण्यासाठी पुरेसे रक्त. सचिंत झालेल्या डॉक्टर व सहकाऱ्यांना मीच धीर दिला, 'डॉक्टर, नाही तरी माझ्या पायाची चाळण झालेलीच आहे. आता भूल न देताच तुम्ही तो कापलात तरी चालेल.' डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वत:चे एक युनिट रक्त मला दिले आणि माझ्यादेखतच माझा पाय कापला गेला.

इकडे मी जीवनमरणाच्या सीमारेषेवर होते; पण हॉस्पिटलबाहेरच्या जगात एक वेगळेच नाट्य घडत होते. 'फुटबॉल आणि व्हॉलीबॉल चॅम्पियन युवती सात तास जखमी अवस्थेत उपचाराविना पडून राहिली' ही बातमी प्रसारमाध्यमांनी उचलून धरलेली. तत्कालीन क्रीडामंत्र्यांनी मला दिल्लीच्या 'एम्स'मध्ये (AIIMS) हलवले, राष्ट्रीय खेळाडू असल्याने अत्युच्च दर्जाच्या सुविधा मला मिळाल्या...पण...पण शल्य एकच होतं, की प्रसारमाध्यमांमध्ये वाटेल त्या वावड्या उठत होत्या. 'अरुणिमाकडे प्रवासाचं तिकीट नव्हतं म्हणून तिने रेल्वेतून खाली उडी मारली' इथपासून ते 'अरुणिमाने आत्महत्येचा प्रयत्न केला', इथपर्यंत काहीही छापून येत होतं. तब्बल चार महिने 'एम्स'मध्ये (AIIMS) राहिल्यानंतर, शारीरिक जखमांवर मलमपट्टी झाली होती; पण या मानसिक जखमांचे घाव अंतरंग घायाळ करणारे होते. मी नि माझं ढालीप्रमाणं रक्षण करणारं कुटुंब-आम्ही सत्य परिस्थिती ओरडून सांगत होतो; पण ती ऐकण्यासाठी ना कुणाला वेळ होता ना रस.

**A2)** i) उत्तरे लिहा. 1

अरुणिमाकडे प्रवासाचे तिकीट नव्हते म्हणून तिने रेल्वेतून उडी मारली.

ii) एका वाक्यात उत्तर लिहा. 1


अरुणिमाला कोणत्या गावातील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले?

**A3)** स्वमत 3

'मानसिक वेदना घायाळ करणाऱ्या असतात' हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

**(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** आकृतिबंध पूर्ण करा. 2




'नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्र' बहुधा आशिया खंडातील सर्वोत्तम असावं. इथे माझे दीड वर्षांसाठी खडतर प्रशिक्षण सुरू झाले. छोटे पण बऱ्यापैकी धोकादायक पर्वत चढणे, जवळपास मरणप्राय कठीण अनुभव, ध्येयापासून विचलित करू पाहणारे कष्टदायी प्रशिक्षण यांतून मी तावून सुलाखून निघत होते.

या प्रशिक्षणाच्या वेळी काही गोष्टी ठळकपणाने लक्षात आल्या. सरावाच्या वेळी चढाई करताना, माझ्या कृत्रिमपायाची टाच व चवडा ज्या वेळी मी जमिनीत रुतवत असे त्या वेळी ते सतत गोल फिरत त्यामुळे तो पाय घट्ट रोवणे कठीण होऊन बसे. उजव्या पायाची हाडे एकत्रित राहण्यासाठी त्यात स्टीलचा रॉड घातलेला होता, त्यावर थोडा जरी दाब दिला गेला तर तीव्र वेदनांचे झटके बसत. माझ्या 'अशा' अवस्थेमुळे प्रथम माझ्यासोबत माझा शेरपा यायला तयारच होईना. साहजिक आहे, जिथे अव्यंग, धडधाकट माणसे गिरिभ्रमण करण्यास धजत नाहीत तिथे माझी काय कथा? पण माझ्या घरच्या लोकांनी माझ्या शेरपाचे मन वळवले आणि मग तिथून पुढे सुरू झाली क्षणोक्षणी आव्हानांना भिडणारी जोशपूर्ण अशी ५२ दिवसांची एक रोमांचकारी लढाई!'

प्रत्येक गिर्यारोहकाला शिखरापर्यंत पोहोचण्याआधी चार बेसकॅम्प्स करावे लागतात. एकदा का तुम्ही 'कॅम्प चार' ला पोहोचलात, की तिथून शिखर ३५०० फुटांवर आहे; पण जास्तीत जास्त मृत्यू याच टप्प्यात होतात म्हणून याला 'डेथ झोन' म्हटले जाते. मला तुम्हांला सांगावंसं वाटतं, की चौथ्या बेसकॅम्पला पोहोचेपर्यंतही आधीच्या कॅम्पसमध्ये मी माझ्या सहकारी गिर्यारोहकांमध्ये नेहमीच पुढे असे. इतकी पुढे, की लोक विचारत, 'मॅडम, हर बार आप हमसे आगे रहते हो! आखिर खाते क्या हो भई?' मी अपंग, त्यात मुलगी, म्हणून कसल्याही प्रकारची सवलत किंवा सहानुभूती नको होती मला...कदाचित याच विचाराचं प्रतिबिंब माझ्या कृतीतून उमटत होतं...

'डेथ झोन'ची चढाई सुरू झाली...जिकडे तिकडे मृतदेहांचा खच पडलेला, हाडं गोठवणारी थंडी, मृत्यूचं जवळून दर्शन होत होतं. मला आदल्या रात्री भेटलेला बांग्लादेशी गिर्यारोहक मृत्युमुखी पडलेला दिसला...पोटातून उसळून वर येणाऱ्या भीतीला मी आवर घालत होते. 'तुला मरायचं नाहीये, अरुणिमा', अंतर्मनाला वारंवार मी हेच बजावत होते. खरं सांगते, आपलं मन जसं सांगतं, तसंच, अगदी तसंच आपलं शरीर वागतं.

**A2)** i) कोष्टक पूर्ण करा. 1

1) जास्तीत जास्त मृत्यू होण्याचे शिखरावरील ठिकाण. → ☐

2) प्रत्येक गिर्यारोहकाला शिखरापर्यंत पोहोचण्यापूर्वी कराव्या लागत. ☐

ii) चौकटी पूर्ण करा. 1

1) अरुणिमाच्या खडतर प्रशिक्षणाचा काळ ☐

2) एव्हरेस्ट सर करण्यासाठी लागलेले दिवस ☐

**A3)** स्वमत 3

प्रत्येकामध्ये एक जिद्दी अरुणिमा असते', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

**(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** आकृतिबंध पूर्ण करा. 2

लग्नानंतर स्त्रियांना या गोष्टींना सामोरे जावे लागते

☐ ☐ ☐ ☐

स्त्रिया निरंतर या संसारात नानाप्रकारचें कष्ट, हाल, तहानभूक, जाच, हाणमार सुसून, फक्त एक तुमच्या गोड शब्दाच्या भुकेल्या असतात. तुम्ही कमावून आणणार. पण त्यांची पुढें व्यवस्था लावून, तुमचे मर्जीप्रमाणे वागून, सदासर्वदा अर्ध्या वचनांत आज्ञांकित राहून या शरिराचे रति रति तुकडे पडून हाडाचे मनी व रक्ताचें पाणी होईतोंपर्यंत अतोनात कष्ट करून, सदा तुमच्या मुखाकडे नजर. तिच्याकडे पाहून जरा तुमची खुषीत हसून दातखिळी उकलली म्हणजे तिला त्या आनंदापुढें त्रिभूवन ठेंगणे वाटतें. पुनः हें असें कष्टाचें ओझें उचलण्यास आणखी नवें नवें काम

शिकण्यास व करण्यास तिला उल्हास येतो. हें तुम्ही आपल्यावरून पहा. तुम्ही म्हणतांना कीं, “अमृतं स्वामीगौरव” तिनें जर कांही एखादें सुरेख शिवणकाम तयार करून तुम्हांला दाखविलें, अगर एखादें नाजूक पक्कान्न निगुतीनें करून वाढलें, तेवेळेस “वा भलेशाबास! हें तूं स्वतः केलेंसना? अग, इतकी मेहनत नको करूं. तुझी पाठ अगर डोळे दुखतील. मुलाचे हाल करूं नको नी वैद्याचे दार पहावयास लावूं नको. चांगले सुखाचें रहाः” अगर एखाद्याने आपले मित्राजवळ, स्नेहमंडळांत “मी फार नशीबवान आहें कीं, मला घरांत कांहीं पहावें लागत नाहीं. घरीं आपलें नेऊन टाकावें मग कांहीं करो. आमच्या घरचेसारखी दुसरी सापडणे कठीण;” असे इतके ममतेचे व भूषणाचे शब्द तिच्या कानीं पडल्याबरोबर ती तो लहानपणापासून जाच विसरून त्या स्वामिगौरवांत, आज मजसारखी भाग्यवान या भूतलावर दुसरी कोणीच नसेल. असें मानून किती बरें तिचें अंतःकरण सद्गद होत असेल. तेव्हां असें तुमचे इतके क्षुल्लक प्रीतीचे तुर असूनही त्यांस नानाप्रकारचे निंद्य विशेषण दिलें. तेव्हां हे तरी त्यांचें प्रालब्धच म्हटले पाहिजे.

**A2)** i) एका वाक्यात उत्तर लिहा. 1

स्त्रियांना काय करण्यात उल्हास वाटतो.

ii) उत्तरे लिहा. 1

पतीच्या चेह-यावरचा आनंद पाहून स्त्रियांच्या भावना -


i. ................

ii. ................

**विभाग २ - पदय**

**प्र.२ (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** आकृतिबंध पूर्ण करा. 2




श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ।।१।।

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ।।२।।

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।३।।

तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये ।
संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ।।४।।

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांही ।।५।।

सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।
पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ।।६।।

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ।।७।।

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ।।८।।

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।।९।।

अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।१०।।

**A2)** i) खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. 1

1) तोंडाळ व्यक्तीला तोंड देत राहावे.

2) व्यापकपणा केव्हाही सोडू नये.

ii) एका वाक्यात उत्तर लिहा. 1

कोठे लाजू नये ?

**A3)** अर्थ लिहा. 2

कवितेतील कोणत्याही 2 ओळींचा सरळ अर्थ लिहा.

**A4)** काव्य सौंदर्य लिहा 2

सभेमध्ये लाजों नये | बाष्कळपणे बोलों नये |
या ओळीतील भावसौदर्य स्पष्ट करा.

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **(4)**

उत्तमलक्षण कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – (०१ गुण)
२) कवितेचा विषय - (०१ गुण)
३) कवितेतून व्यक्त होणारा विचार - (०२ गुण)

**किंवा**

तू झालास मूक समाजाचा नायक कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – (०१ गुण)
२) कवितेचा विषय - (०१ गुण)
३) कवितेतून व्यक्त होणारा विचार - (०२ गुण)

**(इ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा** **(4)**

जनी आर्जव तोंडू नये । पापद्रव्य जोंडू नये
पुण्यमार्ग सोंडू नये । कदाकाळी ।।

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(6)**

**1)** साहित्यिक गिरिजा कीर यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये.




**2)** मधूच कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे या विधानाबाबत तुमचा अभिप्राय स्पष्ट करा.

**3)** 'एक अर्ज आहे बाप्पा' या बालनाटिकेतून मुलांच्या मनाच्या खिडक्या उघडण्याचे कौशल्य लाभले आहे, ते तुमच्या शब्दात व्यक्त करा.

**विभाग ४ - भाषाभ्यास (व्याकरण)**

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1) समास** **(2)**

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| i) प्रतिक्षण | .............. | .............. |
| ii) त्रिमूर्ती | .............. | .............. |

**2) शब्दसिदधी** **(2)**

खालील तक्ता पूर्ण करा.
निर्गंध, समजदार, अवकळा, भवितव्य

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित |
|---|---|
| ............... | ............... |

**3) वाक्यप्रचार -** **(4)**

**खालीलपैकी कोणत्याही दोन वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

**1)** विलंब न लावणे →

**2)** डोके उठणे →

**3)** खस्ता खाणे →

**4)** प्रतिक्षा करणे →

**(आ) भाषासौंदर्य.**

**(1) शब्दसंपत्ती**

**(i) समानार्थी शब्द लिहा.** **(1)**

i. मास – ..............
ii. पांढरा – ..............

**(ii) पुढील शब्दसमूहाबददल एक शब्द लिहा.** **(1)**

i. जिवाला जीव देणारा - ..............
ii. दररोज प्रसिद्ध होणारे - ..............

**(iii) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

i. थंड × ..............
ii. काळोख × ..............

**(iv) शब्दसमूहापासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा.** **(1)**

नातेवाईक → ..............

**(2) लेखननियमांनुसार लेखन** **(2)**

**अचूक शब्द ओळखा.**

**1)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| i. | अ. प्रचंड | ब. प्रंचड | क. प्रंचंड | ड. प्रचन्ड |
| ii. | अ. सास्कृतिक | ब. सांस्कृतीक | क. संस्कृतिक | ड. सांस्कृतिक |
| iii. | अ. दीर्घायुष्य | ब. दिर्घायुष्य | क. दीर्घायूष्य | ड. दिघार्युष्य |
| iv | अ. कौटूंबिक | ब. कौटुंबिक | क. कौटूंबीक | ड. कोटुंबीक |

**(3) विरामचिन्हे -** **(1)**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हेचां वापर करा.**

'पडता पडता किती कटकट करतोयस तू! तुझ्या या दंग्यानं माझ्या सा-या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की?'

**(4) पारिभाषिक शब्द -** **(1)**

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.
i. Verbal - ..............
ii. Labour Court - ..............

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) खालील विषयावर पत्र लिहा.** **(6)**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

महानगर पालिका
नायगाव (पू) महापालिका आयुक्त

पाणी अशुद्ध येत असल्यामुळे तक्रार पत्र

पाणी नियमित यावे यासाठी मागणी पत्र

**किंवा**

**सारांशलेखन**

**विभाग - १ गदय विभागातील प्र.१ इ मधील अपठित उता-याचा १ / ३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(आ) खालील पैकी 1 कृती सोडवा. ( शब्द मर्यादा ६०- ९० शब्द )** **(10)**

**(1) जाहिरातलेखन.**

**खालील शब्दांचा वापर करून एक आकर्षक जाहिरात तयार करा व तिचे पुनर्लेखन करा.**

| | | |
|---|---|---|
| उपहारगृहाचे नाव | पत्ता | संपर्क क्रमांक |
| विविध सेवा | सवलत | विशेष योजना |

**(2) कथालेखन-**

**पुढील अपूर्ण कथा पूर्ण करुन लिहा.**

एकदा तीन मित्र शीहरातून आपल्या गावी चालले होते. जंगलातून तिघे चालले होते. त्यांना खूप भूक लागली होती. आराम करावा व थोडी न्याहरी करावी या उद्देशीने ते झाडाखाली बसले. चालून चालून ते थकले होते. जवळ एक विहीर होती. त्या विहीरीतील पाणी ते प्यायले. त्यातल्या एकाला अचानक काहीतरी सोन्यासारखे चमकताना दिसले. त्याने दोघांना बोलावले. ते तिघेही त्या चमकणा-या वस्तूकडे गेले. तिथे त्यांना एक सोन्याचे नाणे दिसले. शेजारी पडलेले गाठोडे उघडल्यावर त्यात सोन्याची नाणीच नाणी होती. तिघांनी ती नाणी वाटून घ्यायचे ठरवले. तेवढयात एका मित्राने सांगितले की ``आपण आनंद साजरा करण्यसाठी शीहरातील बाजारातून मिठाई आणूया. दोघांनी त्याच्या कल्पनेला मान्यता दिली.

**3) बातमीलेखन**

**विषय : - तुमच्या शाळेत बालदिन साजरा झाला याचे बातमीलेखन करा.**
यात स्थळ, काळ, दिनाक, वेळ, व्यक्ती यांचा उल्लेख करावा.

बालदिन कार्यक्रमाचा वृत्तान्त

१४ नोव्हेंबर
सकाळी १० वा.

मुलांचे नृत्य, नाट्य, गायन, कार्यक्रम

विशेषअतिथी मा. समाजसेवक
नाना पाटेकर

**(इ) लेथनकौशल्य** **(8)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द )**

**1)** वर्गातील बाके बोलू लागली !

१. शाळेच्या भेटीचा प्रसंग
२. विद्यार्थ्यांशी जडलेले नाते
३. उपयोग
४. मुलांकडून होणारा गैरवापर.
५. एखादी आठवण.

**वरील घटकांचे निरीक्षण करून त्यांचे आत्मकथन लिहा.**

**2)** ' मानवता हाच खरा धर्म '

**3)**

**जाहीर निमंत्रण - 'कौतुक सोहळा'**

गावाचे भूषण
'विनय जाधव' यांचा
सैन्यात भरती झाल्याबद्दल समस्त
पारनेर गावक-यांतर्फे जाहीर सत्कार
मुख्य उपस्थिती - मा. सूर्यकांत आगाशे
(निवृत्त कर्नल)

दि. - 9 जून
वेळ - सायंकाळी 5.00
स्थळ - अजिंक्य क्रीडा मैदान, पारनेर.
वरील कौतुक सोहळ्याला तुम्ही गावकरी म्हणून उपस्थित होता. अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.